# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 18/05/2020 (सोमवार)
(दुपार)

### विनयभंग

पो.स्टे. मौदा :– दि. 17/05/2020 चे 10:30 वा. चे सुमारास 19 वर्षीय पिडीत/फिर्यादी व तिचे वडिल हे दोघेही मोटरसायकलने चिकन घ्याला गेले व गाडी लावत असता तीचे बाबा समोर गेले. दरम्यान आरोपी नामे– राजे टिकाराम धुर्वे, वय 47 वर्ष, रा. दिघोरी काळे, ता. कामठी मौदा नागपूर हा तेथे आला व पीडितेचा हात पकडला तेवडयात तीचे बाबा मागे आले व ''तु माझ्या मुलीचा हात कसा का पकडला'' असे म्हणुन ओरडु लागले. तेव्हा आरोपीने अश्लिल शिवीगाळ करून बाजुला ठेवलेली काठी उचलुन पीडितेच्या बाबाच्या पाठीवर मारली व जिवाने मारन्याची धमकी दीली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ), 324, 294, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा काळे 9822549695 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावर एबी लॅबोटरी कंपनी सिहोरा कन्हान येथे दिनांक 17/05/2020 चे 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेंद्र भोलाजी मंडापे, वय 49 वर्ष, रा. कुंभारे कॉलनी कामठी हे एन बी लॅबोटरी सिहोरा कन्हान येथे प्लान्ट इनचार्ज असुन आरोपी नामे– नितीन धोडमारे, वय 40 वर्ष, रा. कन्हान हा दारु पिउन कामावर येत असल्याने त्याला लेबर कॉन्ट्रक्टर यांनी कंपनीतुन कमी केले. फिर्यादी हे कंपनीमध्ये हजर असतांनी आरोपी हा आला व म्हणाला की, ''तुझ्यामुळे मला कंपनीतुन काढुन टाकले'' या कारणावरुन आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन लाकडी दांडयाने कानावर मारले असुन हाताचे मनगटावर मारले व हात फॅक्चर झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोलिस हवालदर रवि चौधरी हे करीत आहेत.

# गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत सत्रापुर वार्ड क्र. 8, कन्हान येथे दिनांक 17/05/2020 चे 13:40 वा. दरम्यान फिर्यादीचा भाऊ नामे– आकाश दुर्योधन जांभुळकर, वय 27 वर्ष, रा. सत्रापुर वार्ड क्र. 8, कन्हान याने अज्ञात कारणातुन राहत्या घरी छताच्या आडव्या बल्लीला दुपटयाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विलास दुर्योधन जांभुळकर, वय 27 वर्ष, रा. सत्रापुर वार्ड क्र. 8, कन्हान यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि मेश्राम 9067176694 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर